असा. क्र. ८३

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-२०३/एमबीआय/२०००

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, डिसेंबर १९, २००० /अग्रहायण २८, शके १९२२

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

### अनुक्रमणिका

पृष्ठे

**सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९.**——महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅट्सबाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासंबंधी) अधिनियम, १९६३, याची मुदत भूतलक्षी प्रभावाने वाढविण्याकरिता अधिनियम. .. .. .. ५४९–५५०

दिनांक १ डिसेंबर २००० रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९.

[मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक १९ डिसेंबर २००० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.].

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅट्सबाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासंबंधी) अधिनियम, १९६३, याची मुदत भूतलक्षी प्रभावाने वाढवण्याकरिता अधिनियम.**

१९६३ चा महा. ४५. **ज्याअर्थी,** महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅट्सबाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासंबंधी) अधिनियम, १९६३, याची मुदत भूतलक्षी

प्रभावाने आणखी वाढविणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एक्कावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅट्सबाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासंबंधी) भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढविणे) अधिनियम, २००० असे म्हणावे.

(२) तो दिनांक १ एप्रिल २००० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम १ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅट्सबाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासंबंधी) अधिनियम, १९६३ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम १ च्या पोट-कलम (४) मध्ये, "२०००" या मजकुराऐवजी "२००५" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९६३ चा महा. ४५.

व्यावृत्ती.

३. या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, कोणतीही व्यक्ती, तिने १ एप्रिल २००० रोजी प्रारंभ होणाऱ्या व **राजपत्रामध्ये** हा अधिनियम प्रसिद्ध झाल्याच्या तारखेस समाप्त होणाऱ्या कालावधीत केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीसंबंधातील अपराधाबद्दल, जर अशी केलेली किंवा करण्याचे वर्जिलेली कोणतीही गोष्ट ही या अधिनियमाद्वारे मुख्य अधिनियमाची मुदत भूतलक्षी प्रभावाने वाढविण्यात आली नसती तर अपराध ठरली नसती तर दोषसिद्ध ठरविली जाण्यास पात्र असणार नाही.

शंका दूर करणे.

४. शंका दूर करण्याकरिता याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, दिनांक ३१ मार्च २००० नंतर समाप्त होणार होता त्या मुख्य अधिनियमाची मुदत दिनांक १ एप्रिल २००० या दिनांकापासून भूतलक्षी प्रभावाने वाढविल्यामुळे तो कोणत्याही वेळी समाप्त झाला होता असे कधीही मानले जाणार नाही व या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या, मुदत वाढविण्यात आलेल्या त्याच्या सर्व तरतुदी या अधिनियमाच्या कलम ३ च्या तरतुदींच्या अधीन राहून अखंडपणे अंमलात असल्याचे मानण्यात येईल.